# प्रेस नोट

## '' पोलीस अधिकारी /कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी शिबीर''

जा.क्र. १४३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–२६/०२/२०१७.

**भंडारा**: पोलीस मुख्यालय येथील मिटींग हॉलमध्ये २६ फेब्रुवारी २०१७ रोजी मा. अपर पोलीस अधीक्षक भंडारा रश्मि नांदेडकर यांच्या अध्यक्षतेखाली भारत पेट्रोलीयम तर्फे '' वैद्यकीय तपासणी शिबीर'' घेण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे कोऑर्डीनेटर डॉ. सागर हे होते, कुंदन अवचाटे भारत पेट्रो. कॉर्पेरेशन लिमीटेड, डॉ. अतुल चोपडे श्रीकृष्ण हॉस्पीटल, डॉ. भाग्यश्री चोपडे नागपूर हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलन करुन वैद्यकीय तपासणी शिबीर या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी डॉ. सागर साहेब कोऑर्डीनेट, श्रीकृष्ण हॉस्पीटल नागपुर यांनी आपल्या भाषणामधुन अधिकारी/ कर्मचारी यानी सर्व प्रकारच्या टेस्ट करुन प्रकृतीची काळजी कशी घ्यावी याविषयी माहिती दिली. तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक भंडारा रश्मि नांदेडकर यांनी भाषणातुन पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय तपासणी बाबत मार्गदर्शन केले.

सदर वैद्यकीय तपासणी दरम्यान पोलीस उपअधिक्षक (गृह) भंडारा श्री. एस. व्ही. कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी साकोली श्री. संख्ये, पोनी. जिवीशा श्री. बी. आर. गाडे, पोनी. राऊत वानीशा भंडारा पोलीस युनिट रूग्णालयाचे डॉ.डब्लु बि. कोचे श्री एच जी. चारमोळे, उदारामजी उके उपनिरीक्षक प्रधान पोलीस मुख्यालय, पोनी. राऊत वानीशा भंडारा जिल्हातील सर्व पोलीस स्टेशनचे/शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यशाळेचे संचालन म. पो.शि. नाकतोडे यांनी केले व आभार प्रदर्शन पोलीस उपअधिक्षक (गृह) भंडारा श्री. एस. व्ही. कुलकर्णी यांनी केले.

(एस. व्ही. कुलकर्णी )
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.